| Publication: Sakal | Edition: Pune |
|---|---|
| Date: September 22, 2016 | Page: 11 |

# 'एचपीएल इलेक्ट्रिक'चा आयपीओ आजपासून

मुंबई, ता. २१ : इलेक्ट्रॉनिक उपकरणे निर्माता एचपीएल इलेक्ट्रिक अँड पॉवरच्या ३६१ कोटी रुपयांच्या प्राथमिक समभाग विक्रीला (आयपीओ) उद्यापासून (ता. २२) सुरवात होत आहे. यासाठी प्रतिशेअर १७५ ते २०२ रुपयांचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे. आयपीओकरिता अर्ज करण्याची शेवटची तारीख २६ सप्टेंबर आहे. समभाग विक्रीतून मिळालेल्या भांडवलाचा उपयोग कंपनीतर्फे कर्जाची परतफेड, खेळत्या भांडवलाची तरतूद आणि इतर जनरल कॉर्पोरेट कारणांसाठी केला जाणार आहे.